<u>**तक्रारदारातर्फे अतिरिक्त सरतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**</u>

**१४.** आता मला तक्रारदार संस्थेने दिलेल्या ठरावाची प्रत दाखवली, तिला **नि. क्र.१७** देण्यात येतो. आता मला आरोपीच्या कर्ज मागणी अर्जाची, कर्जरोख्याची आणि वचनचिठ्ठीची पडताळलेली छायांकित प्रत दाखवली, त्यांना एकत्रीतपणे **नि. क्र.१८** देण्यात येतो. आता मला आरोपीने दिलेला वादातील धनादेश दाखवला, त्यावरती आरोपीची स्वाक्षरी आहे. त्याला **नि. क्र.१९** देण्यात येतो. आता मला आरोपीने दिलेला धनादेश अनादरीत झाल्याचा बँक मेमो दाखवला. त्याला **वस्तू क्र. अ** देण्यात येतो. आता मला आरोपीला दि.१५.०५.२०२४ रोजी पाठवलेल्या नोटीसीची मूळ प्रत दाखवली, तिला **नि. क्र.२०** देण्यात येतो. आता मला आरोपीला सदर नोटीस पाठवल्याची पोस्टाची पावती दाखवली, तिला **नि. क्र.२१** देण्यात येतो. आता मला आरोपीला पाठवलेली नोटीस परत आल्याचा सिलबंद लिफाफा दाखवला, त्याला **नि. क्र. २२** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

<u>**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. डी. डी. आजगेकर वकील.**</u>

**१५.** आरोपी गैरहजर व वकील हजर. आरोपीच्या वकिलांनी दिलेला हजेरी माफीचा उलट तपास घेण्याच्या अटीवर मंजूर. आरोपीच्या वकिलांनी उलट तपास घेण्यास नकार दिला. सबब, उलट तपास नाही असा आदेश करण्यात येतो.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०५.१२.२०२५.                                    (आर. पी. थोरे)

आजरा.                                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.